Literacy for a Billion

Movie: Hamal De Dhamal
Year: 1987

Song: Manmohana…
Lyricist: Vivek Apte

मनमोहना तू राजा स्वप्नातला
मनमोहना तू राजा स्वप्नातला
चल ये राजसा कसा लाभला
एकांत हा तुला मला
मनमोहना तू राजा स्वप्नातला
आज रुप हे गोड तूझे
ना भरोसा उदयाचा
खेळ तुझा प्रेमाचा
घेईल जीव हमालाचा
मनमोहना तू राजा स्वप्नातला
मनमोहना तू राजा स्वप्नातला

कसे फुरावे सांग मला तू
सप्त स्वरांचे गाणे
सूर न आपुला जुळता
कसले धुंद होऊनी जाणे
ना असा होई गंधर्व
कधीही मूर्ख गाढवाचा
आ हा
खेळ व्हायचा तुझा
जायचा जीव हमालाचा
मनमोहना तू राजा स्वप्नातला
मनमोहना तू राजा स्वप्नातला

मी ताल लयीच्या जगात तुजला नेते
मी ताल लयीच्या जगात तुजला नेते
चल टाक पाऊले
नृत्य तुला शिकविते
मोर तुझे लावून होई का
मयूर कावळयाचा
आ हा
खेळ व्हायचा तुझा
जायचा जीव हमालाचा
मनमोहना तू राजा स्वप्नातला
मनमोहना तू राजा स्वप्नातला

हवा कशाला सरस्वतीचा
अलंकार भाषेचा
शब्द येऊ दे ओठांवरती
मनात या प्रेमाचा
सहजपणे साकार होऊ दे
प्रेमभाव मनीचा
कशास आता अभिनय खोटा
हसण्या रडण्याचा
आमच्या रडण्या हसण्याचा
हा खेळ श्रीमंतीचा
खेळ व्हायचा तुझा
जायचा जीव हमालाचा
मनमोहना तू राजा स्वप्नातला
मनमोहना तू राजा स्वप्नातला
चल ये राजसा कसा लाभला
एकांत हा तुला मला
मनमोहना तू राजा स्वप्नातला
मनमोहना तू राजा स्वप्नातला

Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.

PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.